# बृहन्मुंबई महानगरपालिका
## सार्वजनिक आरोग्य खाते
### क्षयरोग रुग्णालय समूह, शिवडी-15.
**काआअ/14431/क्षरुस(वआ) दि. 06.03.2024**

## जाहिरात

सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत क्षयरोग रुग्णालय समूहाच्या आस्थापनेवरील **'नोंदणी सहाय्यक'** संवर्गातील 03 पदे एका वर्षाकरिता कंत्राटी तत्वावर प्रत्येकी 6 महीन्यानंतर एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन मासिक ठोस मानधन रु.14,000/- (रुपये चौदा हजार फक्त) इतक्या वेतनावर भरण्याकरिता खालील नमूद अर्हता धारण केलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे त.

**'नोंदणी सहाय्यक' - 3 पदे**

**शैक्षणिक अर्हता-**

1. उमेदवार हा इंग्रजी, हिंदी व मराठी विषयासह शालांत परिक्षा उत्तीर्ण असावा.
2. अमागासवर्गीय व इतर मागासवर्गीय प्रवर्गाकरीता 50 % पेंक्षा कमी गुण नसावेत.
3. अनुसूचीत जाती, जमाती, भटक्या जाती व विमुक्त जमातीच्या प्रवर्गाकरीता 40 % पेक्षा कमी गुण नसावेत.
4. उमेदवार हा वय वर्षे 18 पेक्षा कमी आणि वय वर्षे 30 पेक्षा अधिक असता कामा नये. तथापि मागासवर्गीय उमेदवारांकरिता वयोमर्यादा वय वर्षे 35 पर्यंत शिथिल करण्यात येईल. अपंग उमेवार असल्यास सद वयोमर्यादा 45 वर्षे पर्यंत शिथिल करण्यात येईल.
5. उमेदवाराच्या शालांत परिक्षेतील टक्केवारीमध्ये, पदवी परिक्षेमधील प्रथम श्रेणीकरिता 10 % द्वितीय श्रेणीकरिता 8 % किंवा तृतीय श्रेणीकरिता 5 % इतके टक्के अंतर्भुत करण्यात येतील.
6. खुल्या प्रवर्गातील उमेदवार हा जर शालांत परिक्षा दुस-या किंवा तिस-या प्रयत्नात उत्तीर्ण झाला असेल तर अनुक्रमे 10 आणि 20 गुण शालांत परिक्षेमधील एकूण गणांमधून वजा करण्यात येतील आणि असे गूण कमी केल्यानंतर एकूण गुणानुसार गुणांची टक्केवारी काढण्यात येईल.
   उमेदवार शालांत परिक्षा चौथ्या प्रयत्नात उत्तीर्ण झालेला असल्यास त्याचा सदर पदासाठी विचार करण्यात येणार नाही.

**सर्वसाधारण अटी-**

1. सार्वजनिक आरोग्य खात्याच्या अखत्यारीतील विभाग/कार्यालये यांच्या आस्थापनेवरील 'नोंदणी सहाय्यक' यांच्या रिक्त पदांच्या प्रमाणात आणि कार्यभार पाहुन कंत्राटी पध्दतीने प्रत्येकी रु.14000/- (चौदा हजार मात्र प्रतिमाह) मानधनावर प्रत्येकी सहा महिन्यांनी एक दिवसाचा तांत्रिक सेवाखंड देऊन एका वेळी सहा महिन्यांच्या कालावधीकरिता स्थानिक पातळीवर कंत्राटी तत्वावरील 'नोंदणी सहाय्यक' या पदांकरीता अर्ज मागवुन निवडीने भरण्यात येतील.

2. सदर कंत्राटी तत्वावरील 'नोंदणी सहाय्यक' या पदावर निवडलेल्या उमेदवारांकडून 200 रुपयांच्या बॉन्ड पेपरवर करारनामा (प्रतिज्ञापत्र) घेण्यात येईल.

3.कंत्राटी कालावधीत काम करणा-या उमेदवरांची सेवा महापालिकेच्या नियमित तत्वावरील सेवेसाठी सेवाजेष्ठतेसाठी विचारात घेतली जाणार नाही. किंवा सेवेचा सेवाजेष्ठतेसाठी प्राधान्य देण्यात येणार नाही. तसेच भविष्यात त्यांना 'नोंदणी सहाय्यक' पदावर हक्क सांगता येणार नाही.

4. सदर पदे ही कंत्राटी तत्वावर भरावयाची असल्याने उमेदवाराची कमाल वयोमर्यादा 30 वर्षे असावी.

5. रुग्णालय प्रमुखांच्या शिफारशीने असमानधानकारक कामाकरिता किंवा इतर कोणत्याही कारणासाठी कार्यकारी आरोग्य अधिकारी यांच्या स्वाक्षरीने सदर उमेदवारांची सेवा कोणतीही पुर्वसुचना दिल्याशिवाय समाप्त करण्यात येईल.

6. सरळसेवेने 'नोंदणी सहाय्यक' या संवर्गातील पदे भरल्यानंतर कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या उमेदवारांची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

**कर्तव्ये व जबाबदा-या-**

1) रुग्णाना 24x7 सेवा देणे, बाहयरुग्ण विभागाशी निगडीत सेवा पूरविणे.

2) तीन्ही पाळीमध्ये काम सांभाळणे.

3) कामावर असताना युनिफार्म परिधान करणे.

4) वरिष्ठ पातळीवरुन वेळोवेळी नेमुन दिलेल्या जबाबदा-या पार पाडणे.

वैद्यकीय अधिक्षक क्षयरोग रुग्णालय समुह यांचे कार्यालय येथे जाहिरात प्रसारित झाल्यापासुन (दि. २५.०३.२०२४ पर्यंत) आलेले अर्ज
वॉक-इन पध्दतीने निवडण्यात येतील.

**पत्ता- वैद्यकीय अधिक्षक, क्षयरोग रुग्णालय समूह,**
**जेरबाई वाडीया रोड, शिवडी, मुंबई-400015.**
**संपर्क 1) भ्रमणध्वनी** :- 9321549133/ 9833486150

**वैद्यकीय अधिक्षक**
**क्षयरोग रुग्णालय समूह**

**नोंदणी सहाय्यक**

**वैयक्तिक माहितीपत्र (BIO-DATA)**

| |
|---|
| उमेदवाराने त्यांचे अलिकडे आढलेले पारपत्र आकाराचे छायाचित्र लावून फॉटोवर स्वाक्षरी करावी २.५ से.मी X ३ से.मी |

१. (अ) संपूर्ण नांव (आडनांव प्रथम) ( मराठीत) : ________________________

(ब ) वडिलांचे / पतीचे संपूर्ण नांव : ________________________

(क) विवाहापूर्वीचे संपूर्ण नाव (महिनांकरिता) : ________________________

२. अ) पत्ता (पोस्टल पिनेकोडसह) : ________________________

________________________

________________________

(ब) दूरध्वनी क्रमांक (एसटीडी क्रमांकासह) भ्रमणध्वनी

(क) ई-मेल आयडी [ ]

३. लिंग : पुरुष [ ] स्त्री : [ ]

४. अ) जन्मदिनांक : दिनांक [ ][ ] महिना [ ][ ] वर्ष [ ]

ब) दि. ०१/०३/२०२२ रोजी असलेले वय _______ वर्षे _________ महिने ___________ दिवस

५. शैक्षणिक अर्हता :-

| शैक्षणिक अर्हता | विद्यापीठाचे नांव | गुणांचा तपशील | | टक्केवारी | उत्तीर्णतेचे प्रयत्न |
|---|---|---|---|---|---|
| | | प्राप्त गुण | पैकी | | |
| दहावी | | | | | |
| बारावी | | | | | |
| पदवी / पदवीका | | | | | |

६. संगणकविषयक ज्ञान : MS-CIT किंवा शासनाने विहित केलेल्या संगणकविषयक अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र : आहे / नाही

७. अनुभव ( असल्यास प्रमाणपत्र जोडावे ) :

८. स्थानिक पोलिस ठाण्याचा संपूर्ण पत्ता : ________________________

________________________

९. अ) उमेदवारास पूर्वी शिक्षा झाली होती का ? होय / नाही.

ब) शिक्षा झाली असल्यास त्याचा तपशील नमूद करण्यात यावा व न्यायालयीन निर्णयाची प्रमाणित प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी.

क) उमेदवारा विरुध्द पोलीस चौकशी / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित वा प्रस्तावित आहे का ? असल्यास तपशील द्यावा.

मी यान्वये प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो / करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून, ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी ...................................... पदाकरीता पात्र आहे. वरीलपैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार रहाणार नाही. अर्जाद्वारे दिलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यास बृहन्मुंबई महानगरपलिका माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई करु शकते याची मला जाणीव आहे.

आपला / आपली विशवासू

दिनांक :
ठिकाण :

अर्जदाराची सही/-
(अर्जदाराचे नाव)

सोबत :

1. PHOTO
2. PAN CARD
3. AADHAR CARD
4. SSC / HSC LEAVING CERTIFICATE
5. SSC / HSC MARK LIST
6. DIPLOMA CERTIFICATE
7. DEGREE CERTIFICATE
8. EXPERIENCE CERTIFICATE